


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026 शुक्रवार दि. ०३ एप्रिल २०२६

आवृती-मुंबई,ठाणे,पालघर,सिंधुदुर्ग,रत्नागिरी




संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १३२ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

# विधान परिषदेवर वैंभवराव पिचड यांना संधी?

## वर्षा बंगल्यावर हालचालींना वेग; आदिवासी नेतृत्वाला पुन्हा बळ!

- **फडणवीसांचा विश्वासू चेहरा पुढे? वैंभवराव पिचड यांच्या नावाची जोरदार चर्चा!**
- **विधान परिषदेसाठी वैंभवराव पिचड आघाडीवर; कार्यकर्त्यांत उत्सुकता!**
- **पिचड कुटुंबाचा राजकीय वारसा पुन्हा सक्रिय? वैंभवराव पिचड यांना संधीची चर्चा!**
- **डॉ. विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून.**

(समर्थ गांवकरी)

मुबंई/ विश्वासराव आरोटे

**राज्याच्या राजकारणात महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या विधान परिषदेसाठी माजी आमदार वैभवराव पिचड यांना संधी मिळण्याची चर्चा सध्या जोर धरू लागली आहे. विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा बंगल्यावर यासंदर्भात हालचाली सुरू असून रिक्त झालेल्या विधान परिषद जागेसाठी वैभवराव पिचड यांचे नाव आघाडीवर असल्याचे समजते. राज्यातील आदिवासी समाजाचा तरुण चेहरा म्हणून ओळख असलेल्या वैभवराव पिचड यांना पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणात सक्रिय करण्यासाठी पक्षस्तरावर सकारात्मक भूमिका घेतली जात असल्याची माहिती मिळत आहे.**

माजी मंत्री स्वर्गीय मधुकरराव पिचड यांचा राजकीय वारसा पुढे नेत वैभवराव पिचड यांनी अकोले विधानसभा मतदारसंघात गेल्या काही वर्षांत संघटन मजबूत करण्यावर भर दिला आहे. मागील विधानसभा निवडणुकीत पक्षश्रेष्ठींच्या आदेशाचे पालन करत त्यांनी अपक्ष उमेदवारी दिली होती. त्यावेळी इतर राजकीय पक्षांकडून उमेदवारी निश्चित असल्याची चर्चा असतानाही त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच माजी खासदार सुजय विखे पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत पक्षनिष्ठा कायम ठेवली.

याच पार्श्वभूमीवर त्यांच्या संघटन कौशल्याचा आणि एकनिष्ठतेचा विचार करून त्यांना विधान परिषदेवर संधी देण्याबाबत चर्चा सुरू असल्याचे सांगितले जात आहे. राज्यातील आदिवासी समाजाचे प्रतिनिधित्व मजबूत करण्यासाठीही हा निर्णय महत्त्वाचा ठरणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आदिवासी समाजातील नेतृत्वाला संधी देण्याचा पक्षाचा प्रयत्न असल्याचीही माहिती मिळत आहे.स्वर्गीय मधुकरराव पिचड यांनी राज्याच्या राजकारणात मोठे योगदान दिले होते. त्यांनी प्रदेशाध्यक्ष, उपमुख्यमंत्री, आदिवासी विकास मंत्री यांसह अनेक महत्त्वाची पदे भूषवली होती. आदिवासींसाठी स्वतंत्र बजेटची संकल्पना राबविणे, आदिवासी जमिनींचे संरक्षण करणारे निर्णय, तसेच ग्रामीण भागातील विकासासाठी विविध योजना राबविणे ही त्यांची महत्त्वाची कामगिरी मानली जाते. नगर जिल्ह्यातील राजकारणात त्यांनी स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले होते.

पिचड पिता-पुत्रांनी काही वर्षांपूर्वी भारतीय जनता पक्षात प्रवेश करत मोठा राजकीय निर्णय घेतला होता. आमदारकीची मुदत पूर्ण होण्यास काही महिने बाकी असतानाही त्यांनी पक्षांतर केले होते. त्या निर्णयामुळे त्यांना पेन्शनचा लाभही मिळाला नाही, मात्र मतदारसंघातील विकासासाठी हा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. त्यानंतर गेल्या दहा वर्षांत त्यांनी विरोधी बाकावर असतानाही मुख्यमंत्री निधीतून विविध विकास कामे आणण्यासाठी प्रयत्न केले.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली अकोले मतदारसंघात संघटन मजबूत करण्यावर त्यांनी भर दिला. अनेक स्थानिक नेत्यांना पक्षात प्रवेश देत पक्षाचा विस्तार करण्यात आला. भावी जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून चर्चेत असलेल्या सुनीता भांगरे यांचा पक्षप्रवेश हा देखील संघटनासाठी महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

दरम्यान, वैभवराव पिचड यांना विधान परिषदेत संधी मिळाल्यास अकोले मतदारसंघाला दोन आमदारांचे प्रतिनिधित्व मिळेल. त्यामुळे विकासासाठी अधिक निधी उपलब्ध होईल, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे. विशेषतः आदिवासी भागातील पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील





प्रलंबित कामांना गती मिळेल, असा विश्वास स्थानिक पातळीवर व्यक्त केला जात आहे.

वर्षा बंगल्यावर सुरू असलेल्या हालचालींमुळे अकोले तालुक्यात राजकीय वातावरण तापले असून कार्यकर्त्यांमध्ये उत्सुकता वाढली आहे. वैभवराव पिचड यांना संधी मिळाल्यास आदिवासी समाजाचे नेतृत्व पुन्हा एकदा राज्य पातळीवर मजबूत होईल, अशी भावना त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केली जात आहे.

# रिक्षा संघटनेशी चर्चेनंतर पुरवठा अधिकार्यांचे आदेश

## गॅस पंपावर दरफलक लावणे, बील देणे बंधनकारक

अहिल्यानगर(समर्थ गांवकरी)



एलपीजी गॅस दरवाढीविरोधात अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेने काढलेल्या मोर्चाची प्रशासनाने तातडीने दखल घेतली आहे. या पार्श्वभूमीवर पुरवठा अधिकारी हेमा बडे यांनी संघटनेचे पदाधिकारी व गॅस कंपन्यांच्या सेल्स मॅनेजर यांची बैठक घेऊन महत्त्वपूर्ण सूचना दिल्या.

फेब्रुवारी २०२६ पूर्वी ४२ रुपये ५० पैसे प्रति लिटर असलेला एलपीजी गॅस दर युद्धानंतर वाढत जाऊन सध्या १०० रुपयांपर्यंत पोहोचल्याचा आरोप संघटनेने केला आहे. या दरवाढीमुळे रिक्षा चालकांचे आर्थिक गणित कोलमडले असून व्यवसाय करणे कठीण झाले आहे.

संघटनेच्या पदाधिकार्यांनी गॅस कंपन्यांकडून मनमानीपणे दरवाढ होत असल्याचा आरोप करत, वाहनांमध्ये गॅस भरताना कमी ऍव्हरेज मिळत असल्याने हेराफेरी होत असल्याचीही तक्रार मांडली. रिक्षा चालक दिवसभर कष्ट करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात, मात्र वाढत्या दरांमुळे त्यांच्यावर आर्थिक ताण वाढला आहे.

पुरवठा अधिकारी बडे यांनी निर्देश दिले की, कंपनीकडून ज्या दराने गॅस व पेट्रोल पुरवठा होतो, त्याच दराने ग्राहकांना वितरण करावे. पंपावर दर्शनीय ठिकाणी दरफलक लावावा. प्रत्येक ग्राहकाला गॅस भरण्यानंतर बिल देणे अनिवार्य राहील. दरम्यान, संघटनेच्या वतीने शहरातील एचपी व इंडियन ऑइलचे बंद असलेले गॅस पंप तातडीने सुरू करण्याची मागणीही करण्यात आली. या बैठकीस शहर पुरवठा तहसीलदार सपना बहुते, संघटनेचे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले, उपाध्यक्ष दत्ता वामन, कार्याध्यक्ष विलास कराळे, सरचिटणीस अशोक औशीकर, लतीफ शेख, गणेश आटोळे, नारीस खान, सुधाकर साळवे उपस्थित होते.

# देवगड फाटा येथे राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व बसेस थांबणार

## भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ खंडाळे सर यांच्या पाठपुराव्याला यश

नेवासा(प्रतिनिधी)

(समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर-संभाजीनगर हायवेवर असलेल्या नेवासा तालुक्यातील देवगड फाटा येथे राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व बसेसला थांबा मिळणार असल्याचे पत्र अहिल्यानगरचे विभाग नियंत्रक यांच्याकडून प्राप्त झाले असून भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ खंडाळे सर यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

नेवासा तालुक्याचे भाजपचे जेष्ठ नेते रामभाऊ खंडाळे सर यांनी देवगड हे मोठे तीर्थक्षेत्र असल्याने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येथे मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत असतात मात्र येथे लांब पल्ल्याच्या बसेसला थांबा नसल्याने भाविकांची मोठी गैरसोय होत होती ही समस्या ओळखून रामभाऊ खंडाळे सर यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री व राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे ही मागणी पाठपुरावा करून लावून धरली होती अखेर ना.विखे यांच्या आदेशानुसार विभाग नियंत्रक यांनी सर्व बसेस देवगडफाटा येथे थांबतील असे पत्र दिल्याने दुरवरून येणाऱ्या भाविकांची मोठी सोय होणार आहे. विभाग नियंत्रक अहिल्यानगर यांनी रामभाऊ खंडाळे सर यांना दिलेल्या पत्रात राज्य परिवहन महामंडळाच्या पुणे,छत्रपती संभाजीनगर, जालना, जळगाव या विभागातील धावणाऱ्या सर्व बसेस देवगड फाटा येथे थांबतील याबाबत सर्व संबधीत आगार व्यवस्थापकांना ही कळविले असल्याचे पत्रात स्पष्ट केले आहे. लांब पल्ल्याच्या सर्व बसेस येथे थांबणार असल्याने या भागातील नागरिक व देवगड भक्त परिवारातील सेवेकऱ्यांनी नामदार राधाकृष्ण विखे पाटील,रामभाऊ खंडाळे सर यांना धन्यवाद देऊन पाठपुरावा केल्याबद्दल अभिनंदन केले आहे.गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांनी समाधान व्यक्त करत रामभाऊ खंडाळे सर व त्यांना पाठपुरावा करण्यासाठी सहकार्य करणारे साहेबराव महाराज चावरे व सेवेकरी खंडू शिंदे यांचा श्रीफळ प्रसाद देऊन सन्मान केला.








# अकोले तालुक्यातील भाजपचा संघर्षमय प्रवास; कार्यकर्त्यांच्या बळावर कमळ फुलत गेले!

## कम्युनिस्ट बालेकिल्ल्यातून भाजपचा उदय; अकोले तालुक्यातील ४० वर्षांचा राजकीय प्रवास, शून्यातून शिखराकडे

## अकोले तालुक्यात भाजप संघटन उभारणीची कहाणी: कार्यकर्त्यांच्या जिद्दीने अकोलेत भाजपचा विस्तार; स्थापना दिनानिमित्त प्रवासाचा आढावा!

(समर्थ गांवकरी)

भारतीय जनता पार्टी ची १९८० साली मुंबई येथे अटलबिहारी वाजपेयी व लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली स्थापना झाली. अकोले तालुका हा कम्युनिस्ट विचारसरणीचा व नंतर काँग्रेस चा बालेकिल्ला झाला. या तालुक्यात जनसंघाचा कार्यकर्ता पाहायला नव्हता... भाजप स्थापन झाल्यानंतर १९८४ साली अकोले तालुक्यात भाजपची स्थापना झाली मारुती गभाले हे तालुकाध्यक्ष झाले. पण मधुकरराव पिचड यांनी सहा महिन्यातच तालुकाध्यक्ष मारुती गभाले काँग्रेस मधी घेतले. नाशिक लोकसभे ला अकोले तालुका जोडलेला असल्याने १९८४ साली पोपटराव हिरे उभे राहिले त्यावेळी अकोले तालुक्यात नगण्य मते मिळाली.पक्षाने अकोले तालुक्यात भाजप पक्ष विस्तार करायचा असेल तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्वयंसेवक पाहिजे. म्हणून मुंबई वरून आलेले सिताराम भांगरे यांना अध्यक्ष केले. मात्र १९८९ ला डॉ. दौलतराव आहेर हे उभे राहिले यावेळी मात्र अतिशय चांगले मतदान झाले. त्यावेळी कळस येथे भाजपचे नेते सूर्यभान पाटील वहाडणे यांची सभा झाली.त्यांचे विचार ऐकून मला भाजपा हा राष्ट्रभक्ती, देशप्रेम, हिंदुत्ववादी विचारसरणीचा पक्ष वाटला.

तसे मी लहान असल्यापासून मला राजकारणची आवड होती आमचे चुलते श्री. कारभारी तंबाजी वाकचौरे, कै. माधव दौलत वाकचौरे, श्री. के.डी. गवांदे बाबा, यादव अनाजी वाकचौरे यांच्या सानिध्यात कायम त्यांची बैठक असली की चहा दे, पाणी दे असे नेहमी काम करीत असलो तरी राजकारण हा आवडीचा विषय होता. शिवाय हे सर्व त्यावेळचे गावातील काँग्रेस विरोधी विचार सरणची नेते मंडळी होती. त्यानंतर विनायक वाकचौरे, ज्ञानदेव वाकचौरे, कै. अमृता वाकचौरे, बाजीराव ढगे, रावसाहेब वाकचौरे हि शिवसेना विचारसरणी ची त्याकाळात तरुण कार्यकर्ते होते. त्यांच्या समवेत ही हिंदुत्वाची विचारसरणी अंगिकारली होती.

माझी आई विड्या बांधायची तिची कम्युनिस्ट विचार सरणी होती. तिने अनेक आंदोलनात भाग घेतला. अनेक वेळा जेल मध्ये गेली. मला पण मी छोटा असताना जेल मध्ये घेऊन गेली तर अनेक वेळा आज्ञी जवळ ठेऊन गेली. पण माझ्या मनात ही विचार सरणी कधी आली नाही. आमचे मामा माजी मंत्री बी. जे. खताळ पाटील हे काँग्रेस विचारसरणी चे पण त्यांनी १९८५ नंतर राजकारणाला रामराम केला. त्यामुळं काँग्रेसचा विषय मनात आला नाही.

माझ्या मनावर जन्मजात हिंदुत्व विचारसरणी रुजली असल्याचा एक छोटा पुरावा म्हणजे आम्ही चौथीत म्हणजे १९८४ साली गणपती उत्सव साजरा करण्यासाठी धर्मवीर संभाजीराजे गणेशोत्सव मंडळ स्थापन केले होते. त्यावेळी धर्मवीर संभाजीराजे माझे प्रेरणास्थान होते.


१९९१ साली दहावी पास होऊन कॉलेज ला गेलो अन अखिल भारतीय विद्यार्थी परिषदचा सभासद झालो. त्यातून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सानिध्यात आलो. १९९३ ला तालुकाध्यक्ष सिताराम भांगरे यांच्या संपर्कात आलो. मच्छिंद्र मंडलिक यांचे सम्राट टेलर हे आमचं कार्यालय झालं. राजेंद्र धारणकर, जालिंदर वाकचौरे, नंदकुमार विसाळ, रामुशेठ मुंदडा, कै. दौलत अण्णा देशमुख, धनंजय संत, रमेश राक्षे, दत्ता देशमुख , नितीन जोशी, मोहन मुंडे, भाऊसाहेब बाळसराफ, रामनाथ काकड सर, सलीमखान पठाण, सौ.मालतीताई भालेराव, पुष्पाताई वाणी, रत्नप्रभा रसाळ, अशोक रेवगडे, भास्कर काळे, नामदेव आहेर, सुरेश गायकवाड अशी मोजकी मंडळी होती.

सिताराम भांगरे तालुकाध्यक्ष असताना मला भाजयुमो च्या तालुका उपाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली. रमेश राक्षे युवा मोर्चा चे अध्यक्ष होते. नंतर नंदकुमार विसाळ अध्यक्ष झाले अन मी युवा मोर्चा चा सरचिटणीस झालो. जालिंदर वाकचौरे तालुकाध्यक्ष झाले, मी युवा मोर्चा चा तालुकाध्यक्ष झालो. बाळासाहेब कानवडे सरचिटणीस, दिनेश शाह , कैलास जाधव, ड. बाळासाहेब वैद्य, दिलावर पठाण, सुभाष लांडगे, असे कार्यकर्ते कार्यकारणी त होते ते नंतर त्यातील काही राष्ट्रवादीत गेले.

मी युवा मोर्चा अध्यक्ष असताना संपूर्ण अकोले तालुक्यात स्थिरता ज्योत यात्रा तर नगर जिल्ह्यात अटल कारगिल संदेश यात्रा काढून तालुका व जिल्हा पिंजून काढला.

दिल्लीतील डंकेल प्रस्ताव विरोधातील मोर्चा असो, मुंबईतील विद्यार्थी ठिय्या आंदोलन असो, पुणेतील महिला मेळावा असो, पाथर्डी ला गोपीनाथ मुंडे ची संघर्ष यात्रा असो, पंढरपूर ला अटलजी ची सभा असो, नगर ला अडवाणीजी ची सभा असो आम्ही हजर च असायचो... मानवी साखळी असो की साध्वी ऋतुबरा देवी, साध्वी उमा भारती, आचार्य धर्मेंद्रजी यांची धर्मजागरण परिषद ला पण आम्ही गेलो.

त्याकाळी झालेले जिप निवडणूक मध्ये राजूर गटात गोपाळा गभाले गुरुजी, दत्ता देशमुख, मोहन मुंडे यांचा थोडया मताने पराभव झाला. खिरविरा पंचायत समिती गणाची पोटनिवडणूकित दत्तू घोटे यांना उभे केले प्रचार करीत कम्युनिस्ट यांचा बालेकिल्ला असलेल्या भागात त्यांना तीन नंबर ढकलून भाजपा दोन नंबर आला. सहकार च्या निवडणूक मध्ये दूध संघात काळू पाटील बेनके तर मार्केट कमिटी मध्ये विवेक समुद्र, साखर कारखानात नामदेवराव वाकचौरे यांचा विजय भाजपा च्या अकोले राजकारणात उदय ठरत होता. मी पण कळस गावचा सरपंच झालो बाळासाहेब मुळे विरगाव असे दोघे जण अख्या तालुक्यात.. त्यानंतर गावच्या राजकारणात ईश्वर वाकचौरे, दौलत वाकचौरे, जनार्दन गवांदे, भास्कर कानवडे, सुभाष कानवडे, विष्णू वाकचौरे यांची मोलाची साथ लाभली...



१९८० चे दशक: संघटन उभारणीची कठीण वर्षे



२००४: वाढता जनाधार



आज: अकोलेचा नवा राजकीय चेहरा

अकोले तालुक्यात मात्र मग पक्षाला थोडं गटबाजी च ग्रहण लागलं अन पक्षाचं अधोगती झाली. जालिंदर वाकचौरे, धनंजय संत, दिनेश शाह, यांनी पक्षाची धुरा सांभाळली खरी पण नाशिक लोकसभा शिवसेनेला युतीत गेला व तालुक्यातील विधानसभा सहित जिल्हा परिषद पंचायत समितीच्या जागा शिवसेना ला सोडल्याने पक्ष विस्तार रोखला गेला. २०१४ ला सेने बरोबरची युती तुटली अन राज्यात पहिला उमेदवार अशोकराव भांगरे च्या रूपाने जाहीर केला. त्यांचे समवेत शिवाजीराजे धुमाळ, वसंतराव मनकर यांनी पक्षात प्रवेश केला. आम्ही तीन नंबर ला राहिलो. पण नवीन कार्यकर्ते भाजपा त आले. नगर पंचायत निवडणूकित सोनाली नाईकवाडी च्या रूपाने कमळ फुलले. अन त्यानंतर झालेले जिप पोटनिवडणुकीत डॉ किरण लहामटे यांच्या रूपाने पाहिले कमळ पोहचले...! भाजयुमो प्रदेश कार्यकारणीवर सिताराम भांगरे व भाजप प्रदेश कार्यकारणीवर जालिंदर वाकचौरे यांना तर वैभवराव पिचड यांना जनजाती मोर्चा च्या राष्ट्रीय मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली आहे.

भाजपा ची स्थापना तालुक्यात करणारे सिताराम भांगरे यांनी भाजपा जर तालुक्यात पुन्हा एक नंबर न्यायचा असेल तर भाऊसाहेब तू संघटन सरचिटणीस होयला लागेल असे भाजप अध्यक्ष निवडणूक आधी तीन महिने आधीच सांगितले होते. सगळ्या चा विरोध झुगारून सिताराम भांगरे अध्यक्ष झाले. नवीन कार्यकारणी सर्वांना विश्वासात घेवून केली. नवीन बूथ रचनेचा कार्यक्रम आला विधानसभा मतदारसंघात ३०७ बूथ वर बूथ प्रमुख नेमणे अवघड गोष्ट त्याशिवाय ऑनलाइन पध्दतीने नेमून करायची असा परिस्थिती मध्ये हे बूथ प्रमुख नेमणूक झाली. तीन जिल्हा परिषद सदस्य व चार पंचायत समितीचे सदस्य निवडून आणून सिताराम भांगरे यांच्या नेतृत्वाची चुणूक दाखवली. जालिंदर वाकचौरे व दत्ता देशमुख यांचे सारख्या एकनिष्ठ कार्यकर्त्यांचा विजय मनाला उभारी देणारा ठरला. अकोल्याचे विद्यमान आमदार डॉ किरण लहामटे, सुनीताताई भांगरे हे जिल्हा परिषदेचे तर दत्तात्रय बोऱ्हाडे, उर्मिला राऊत, अलका अवसरकर हे पंचायत समितीचे सदस्य झाले नंतर कमळ चिन्हावर निवडून आलेले दत्तात्रय बोऱ्हाडे व उर्मिला राऊत यांना पंचायत समितीचे सभापती पद, तर दत्ता देशमुख यांना उपसभापती पदाची संधी मिळाली. अकोले नगरपंचायत वर भाजपाचा झेंडा फडकला सोनाली नाईकवाडी हिला प्रथम महिला नगराध्यक्ष पदाची संधी मिळाली बाळासाहेब वडजे हेही भाजपाचे नगराध्यक्ष झाले.

सिताराम भांगरे यांच्या विनंती वरून पालकमंत्री राम शिंदे सर यांनी मला आमदार अध्यक्ष असणारी संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष पदी व जालिंदर वाकचौरे यांनी शेतकरी सल्ला समिती (आत्मा )चे सदस्य पदी संधी दिली. अकोले तालुक्यातील तीन हजार गोरगरीब, निराधार, दिव्यांग व्यक्ती ना लाभ देता आला.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अकोले तालुक्याचे सुपुत्र व महाराष्ट्र राज्याचे आदिवासी समाजाचे नेतृत्व, माजी मंत्री मधुकरराव पिचड व तालुक्याचे विध्यमान आमदार वैभवराव पिचड यांचे भाजपात प्रवेश झाला. ज्यांचे विरोधात राजकारण करीत होतो त्यांच्या सोबत करायचे म्हणजे अवघड गोष्ट होती. गावा गावात त्यांचे कार्यकर्ते नेते यांच्या विरोधातील कार्यकर्ते म्हणजे भाजपा चा कार्यकर्ता होता. त्यामुळे त्यांचं मनोमिलन हा जरा संशोधन चा विषय ठरला. पण आमचे कळस गावातील नेते कैलासराव वाकचौरे अन आमचे लगेच मनोमिलन झाले. कारण निवडणुकीत आम्ही त्यांना विरोध करायचो पण निवडणुकी नंतर आम्ही राजकारण केले नाही

आम्ही पिचड कुटुंबाच्या विरोधातील परंतु वैभवभाऊ यांचा दिलखुलास स्वभाव, धार्मिक वृत्ती, अन कार्यकर्ता जपणारे मन व लाल्या गोड बाल्या गोड अस न वागता आपला तो आपला ही वृत्ती मनाला भावली तर मोठे साहेबांनचा या वयातील अभ्यासू स्वभाव अन कार्यकर्त्यांवर प्रेम करणारे व्यक्तीमत्व आहे. सुनीताताई भांगरे यांनी पुनश्च भाजपात प्रवेश करून पक्ष बळकट करण्याचे काम केले आहे. अजूनही अनेक कार्यकर्ते लाइन मध्ये उभे आहेत.

**भाजपा तालुकाध्यक्ष**

मारुती गभाले, सिताराम भांगरे, ॲड नंदकुमार विसाळ, जालिंदर वाकचौरे, मोहन मुंढे, धनंजय संत, दिनेश शाह, सिताराम भांगरे, यशवंत आभाळे

**भाजपाचे पहिले**

अमृतसागर दूध संघ संचालक – काळू बेनके, अकोले कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक – विवेक समुद्र, अगस्ती साखर कारखाना संचालक – नामदेवराव वाकचौरे, विधानसभा लढवणारे – अशोकराव भांगरे, जिल्हा परिषद सदस्य – डॉ. किरण लहामटे, नगरपंचायत नगरसेवक व नगराध्यक्ष – सोनाली नाईकवाडी , जिल्हा परिषद गटनेता – जालिंदर वाकचौरे , पंचायत समिती सभापती – दत्तात्रय बोऱ्हाडे , पंचायत समिती उपसभापती – दत्तात्रय देशमुख, संजय गांधी निराधार समिती – भाऊसाहेब वाकचौरे , प्रकल्पस्तरिय समिती – सुनीता भांगरे, आदिवासी विकास महामंडळ संचालक – वैभवराव पिचड

अकोले तालुक्याचे सुपुत्र शंकरजी गायकर विश्व हिंदु परिषदेचे राष्ट्रीय महामंत्री, प्रा. एस.झेड. देशमुख पतीत पावन संघटनेचे प्रांत अध्यक्ष व शरद शेळके जनजाती कल्याण आश्रमाचे प्रांत सचिव आहेत.

**श्री. भाऊसाहेब वाकचौरे पाटील**
**जिल्हा संयोजक भाजपा, सोशल मीडिया सेल उत्तर नगर जिल्हा**

असा हा भाजपा चा २८ वर्षाचा प्रवास सहज तरळून गेला...यामध्ये प्रदेश अध्यक्ष कै सूर्यभान वहाडणे पाटील, कै. ना.स. फरांदे सर, केंद्रीय मंत्री कै. दिलीप शेठ गांधी, राष्ट्रीय उपाध्यक्ष मा. शाम भाऊ जाजू, तत्कालीन आमदार, माजी खासदार सदाशिवराव लोखंडे, माजी आमदार चंद्रशेखर भाऊ कदम, मंत्री व विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे सर, मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, उत्तर महाराष्ट्र विभागीय संघटन मंत्री रवीजी अनासपुरे, खासदार सुजय दादा विखे पाटील मा. प्रा. भानुदासजी बेरड सर, मा.आ. बाळासाहेब मुरकुटे, मा.आ. स्नेहलता कोल्हे, जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी गोंदकर, नितीन दिनकर, नितीन कापसे, प्रकाश चित्ते, सोशल मिडिया सेल चे प्रदेश अध्यक्ष मा प्रविणजी अलाई, समीर आंबोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र गोंदकर यांनी जिल्ह्याचे सोशल मिडिया सेल च्या उत्तर नगर जिल्हा संयोजक पदाची जबाबदारी दिली. सोशल मीडिया, आय टी सेल, मीडिया विभाग यांमध्ये काम करताना पक्षाला न्याय देण्याचं काम केले.

अकोले तालुक्यात ज्यांना भाजपा अस्पृश्य वाटत होता ते सर्व भाजपा च्या मांडवा खाली येऊन गेले. आमचं खर ध्येय तेव्हा साध्य होईल जेव्हा कमळ चिन्हावर भाजपचे आमदार म्हणून निवडून येईल.

गर्व नाही अभिमान आहे मला भारतीय जनता पार्टीचा सक्रिय कार्यकर्ता असण्याचा. ऐकेकाळी ज्या पक्षाच्या व्याप्ती ची खिल्ली उडवली जायची तो पक्ष आज देशातच नाही तर जगातला सगळ्यात मोठा पक्ष झाला आहे आणि त्याचं कारण फक्त एकच आहे की या पक्षाचा केंद्रबिंदू हा पक्षाचा हाडाचा कार्यकर्ता आहे. या पक्षाने समर्पण शिकवलं,या पक्षाने सातत्य शिकवलं, पक्षाने समाजात वावरायला शिकवले, हा पक्ष नसून एक परिवार आहे जो कार्यकर्त्यांना ज्ञान आणि संस्कार देऊन राष्ट्रकार्यासाठी काम करायला प्रेरित करतो. सर्वात मोठा राजकीय पक्ष अशी ओळख निर्माण करणाऱ्या भारतीय जनता पार्टीचा आज स्थापना दिवस. अनेक ज्येष्ठ आणि जाणत्या नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपची वाढ झाली आहे व यापुढेही होत राहील. पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्वाखाली देश व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य वेगाने प्रगती करत आहे. राष्ट्रहिताचा घेतलेला वसा पुढे नेत भाजपाच्या यशाची कमान अखंड उंच राहो या सदीच्छांसह भाजपाचे सर्व कार्यकर्ते, सभासद नेते आणि समर्थकांना स्थापना दिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# कुत्र्यांच्या हल्ल्यातून बगळ्याच्या मादीचे प्राण वाचवणाऱ्या उमेर खाटीकचे कौतुक!


राजूर (समर्थ गांवकरी)

कुत्र्यांच्या हल्लयामध्ये बगळ्याची मादी भक्षस्थानी पडण्याअगोदरच राजूर येथील श्री स्वामी समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता पाचवीचा विद्यार्थी उमेर आयाज खाटीक याने धाडस दाखवत कुत्र्यांवर जोरदार प्रतिकार करून बगळ्याच्या मादीचे प्राण वाचवले. उमेरच्या या धाडसी कृतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही 'चिमणी वाचवा' अभियानांतर्गत विद्यालयात शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी चिमण्यांसाठी घरटी तयार केली असून त्यांना अन्न व पाण्याची सुविधा शाळेत तसेच घराच्या छतावर उपलब्ध करून दिली आहे. अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये प्राणिमात्रांबद्दल प्रेम, आस्था व आपुलकी निर्माण होत असल्याचे या घटनेतून दिसून आले.

उमेरने अतिशय निर्भीडपणे कुत्र्यांना दूर हुसकावून लावले व जखमी अवस्थेतील बगळ्याला सुरक्षितपणे विद्यालयात आणले. त्याला पाणी पाजून सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात आले.

प्रा. किरण भागवत व शिक्षकांच्या मदतीने पक्ष्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले. तात्काळ उपचार मिळाल्याने काही वेळात पक्षी शुद्धीवर आला. घटनेची माहिती मिळताच प्राचार्य किरण भागवत यांनी वनक्षेत्रपाल पडवळे यांच्याशी संपर्क साधला.




त्यांच्या सूचनेनुसार वन कर्मचारी संतोष दिघे यांनी विद्यालयात येऊन बगळ्याला ताब्यात घेतले. उपचारानंतर बगळ्याला पूर्णपणे बरे वाटल्यानंतर निळवंडे धरण परिसरातील नैसर्गिक अधिवासात सोडण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.उमेरच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल संस्थेचे सचिव शांताराम काळे, संतोष बनसोडे, प्राचार्य किरण भागवत, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन केले. या घटनेमुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्राणी व पक्ष्यांबद्दल करुणा बाळगण्याची प्रेरणा मिळाली. वनविभागाकडून पक्ष्याला तंदुरुस्त करून निसर्गात सोडण्यात येणार असल्याची माहिती मिळताच विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला.

# सुनील गोसावी संपादित क्रांतीदिप : कॉ.बाबा आरगडे गौरव ग्रंथास उत्कृष्ट ग्रंथ निर्मिती पुरस्कार जाहीर



अहिल्यानगर(समर्थ गांवकरी)




कर्जत येथे ५ एप्रिल रोजी होणाऱ्या साहित्यरत्न, सत्यशोधक डॉ. अण्णा भाऊ साठे राज्यस्तरीय साहित्य संमेलनात प्रदान करण्यात येणारा उत्कृष्ट ग्रंथ निर्मिती पुरस्कार शब्दगंधचे संस्थापक व सचिव सुनील गोसावी यांनी संपादित केलेल्या 'क्रांतीदीप : कॉ. बाबा आरगडे' या गौरवग्रंथास जाहीर झाला आहे, अशी माहिती कर्जत तालुका साहित्यप्रेमी मंडळाचे अध्यक्ष तानाजी डाडर यांनी दिली. शब्दगंध प्रकाशनच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या गौरवग्रंथात कॉ. बाबा आरगडे यांच्या कार्य व व्यक्तिमत्त्वावर विविध मान्यवरांचे लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. या ग्रंथाचे संपादन सुनील गोसावी यांनी केले असून मुखपृष्ठ रचना सतीश कुलकर्णी यांनी तर संगणकीय अक्षरजुळवणी श्रीपाद कुलकर्णी यांनी केली आहे.

सदर संमेलन कर्जत येथील दादा पाटील महाविद्यालयात ज्येष्ठ कवी व माजी आमदार लहू कानडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे.

यावेळी विद्रोही कवी नितीन चंदनशिवे, प्रा. मच्छिंद्र सकटे, प्रा. शरद गायकवाड आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. या यशाबद्दल शब्दगंध साहित्यिक परिषदेचे अध्यक्ष राजेंद्र उदागे, कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे, कॉ. सुभाष लांडे पाटील, प्राचार्य शिवाजीराव देवढे, प्राचार्य चंद्रकांत भोसले, प्रमोद देशपांडे, प्रा. डॉ. मिलिंद कसबे, तसेच सोळाव्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष व अहिल्यानगर महानगरपालिकेचे नगरसेवक संपतदादा बारस्कर यांच्यासह अनेक मान्यवरांनी सुनील गोसावी यांचे अभिनंदन केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# फ्यूज कॉल सेवा ठप्प; वसमत अंधारात, नागरिक संतप्त

वसमत प्रतिनिधी (समर्थ गांवकरी)

वसमत : शहरातील वीज सेवेचा अक्षरशः बोजवारा उडाल्याचा आरोप करत पत्रकार, व्यापारी व नागरिकांनी एकत्र येत तहसीलदार शारदा दळवी यांना निवेदन सादर केले. विशेषतः फ्यूज कॉल सेवा पूर्णपणे ठप्प झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आणि संतापाची लाट उसळली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, फ्यूज कॉल क्रमांकावर वारंवार संपर्क साधूनही कॉल लागत नाही; लागला तरी कोणताही प्रतिसाद मिळत नाही. अनेकदा संबंधित कर्मचाऱ्यांचे मोबाईल बंद किंवा 'स्विच ऑफ' अवस्थेत असतात. काही वेळा कॉल 'फॉरवर्ड'वर ठेवून जबाबदारी टाळली जात असल्याचा गंभीर आरोपही नागरिकांनी केला. वीज ग्राहकांच्या अडचणी सोडवण्याची जबाबदारी असलेले अधिकारीच संपर्काबाहेर असतील, तर नागरिकांनी न्याय कुठे मागायचा? असा संतप्त सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला.

व्यापारी संघटनेने शहरात २४ तास कार्यरत स्वतंत्र फ्यूज कॉल नियंत्रण कक्ष तातडीने सुरू करण्याची मागणी केली आहे. पूर्वी देशपांडे पेट्रोल पंप परिसरात असे कार्यालय सुरू होते, जिथे दिवसरात्र कर्मचारी उपलब्ध राहत होते. फोन सेवा खंडित झाल्यास नागरिकांना थेट कार्यालयात जाऊन तक्रार नोंदवण्याची सुविधा होती. मात्र सध्या संध्याकाळी ५ नंतर कार्यालय बंद राहत असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

याशिवाय, शहरातील डीपी (डिस्ट्रिब्युशन पॉईंट) देखभाल अत्यंत निकृष्ट दर्जाची असल्याचा आरोपही करण्यात आला. फ्यूजमध्ये योग्य वायरचा अभाव, जुगाड पद्धतीने 'जम्पर' लावणे, नट–बोल्ट नसणे अशा गंभीर त्रुटींमुळे अगदी हलक्या वाऱ्यानेही वीजपुरवठा खंडित होत असल्याचे समोर आले आहे. मेंटेनन्सच्या नावाखाली केवळ दिखावा सुरू असून प्रत्यक्षात काम शून्य आहे, अशी जोरदार टीका नागरिकांनी केली.

या वेळी पत्रकार फिरोज पठाण, रामू चौहान, शेख अफसर, हरनाम सिंह, श्रीधर वडवंते, शरीफ आलम, नागेश चौहान, अयूब पठाण, नवीद अहमद, करण बोबडे, नासर पठाण, शेख इलियास, मोइन कादरी यांच्यासह व्यापारी सुभाष लालपोतू, मनमत बेले, वसंत चेपुरवार, कापूस्करी, महागावकर, कुलथे, रहीम खान (गब्बर), मास्के सर आदी उपस्थित होते.

इशारा :

वीज विभागाने तातडीने फ्यूज कॉल सेवा सुरळीत करून २४ तास नियंत्रण कक्ष सुरू केला नाही, तर येत्या काळात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा नागरिकांनी दिला आहे.




# इंदापूर नगरीत हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा; मुकुंद शहा व भरत शहा यांची उपस्थितीती



इंदापूर प्रतिनिधी (समर्थ गांवकरी)

भक्ती, शक्ती आणि चैतन्याचे प्रतीक असलेल्या हनुमान जयंतीचा उत्सव इंदापूर शहरात अत्यंत मंगलमय वातावरणात आणि मोठ्या उत्साहात संपन्न झाला. शहरातील मानाच्या हनुमान मंदिर ट्रस्ट वतीने आयोजित करण्यात आलेल्या या जन्मोत्सव सोहळ्याला राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून श्री हनुमानाचे दर्शन घेतले.

या विशेष कार्यक्रमासाठी इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मा. मुकुंद शहा आणि इंदापूरचे नगराध्यक्ष भरत शहा यांनी उपस्थित राहून महाआरती व विधीवत पूजन केले.

भक्तीमय वातावरणात कार्यक्रमाची रेलचेल

हनुमान जयंतीनिमित्त मंदिर परिसरात पहाटेपासूनच भाविकांची मांदियाळी पाहायला मिळाली. उत्सवाचे स्वरूप पुढीलप्रमाणे होते:

विधीवत पूजन: पहाटे श्रींच्या मूर्तीला अभिषेक व विशेष अभिषेक पूजा करण्यात आली. त्यानंतर आकर्षक फुलांची सजावट मंदिर परिसरात करण्यात आली होती. जन्मोत्सव सोहळा: सूर्योदयाच्या वेळी ' हनुमानाचा जन्मोत्सव मोठ्या जयघोषात साजरा झाला. यावेळी उपस्थित भाविकांनी बजरंग बली की जय च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

प्रसाद वाटप: मंदिर ट्रस्टच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते, ज्याचा लाभ हजारो भाविकांनी घेतला.

मान्यवरांचे मनोगत : याप्रसंगी बोलताना मुकुंद शहा म्हणाले की, हनुमान जयंती हा केवळ धार्मिक उत्सव नसून तो युवकांसाठी शक्ती आणि निष्ठेची प्रेरणा देणारा दिवस आहे. इंदापूरची ही परंपरा शहराची सांस्कृतिक ओळख टिकवून ठेवणारी आहे. तर, भरत शहा यांनी शहराच्या सुख–समृद्धीसाठी मारुतीरायाला साकडे घातले आणि ट्रस्टच्या नियोजनाचे कौतुक केले.

# बावडा, निरनिमगाव, वडापुरी परिसरात हनुमान जन्मोत्सव उत्साहात संपन्न

इंदापूर प्रतिनिधी (समर्थ गांवकरी)



चैत्र शुद्ध पौर्णिमे दिवशी सूर्य उदयाला बावडा, नीर निमगाव,सराटी , वकीलवस्ती,सुरवड या गावांमध्ये भजन कीर्तन व महाप्रसादाने हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला.

हनुमान जन्मोत्सवापूर्वी गावागावात जागर निमित्त कीर्तन, भजन करण्यात आले. तर प्रत्येक हनुमान मंदिरामध्ये ठिकठिकाणी रोषणाई करण्यात आली होती. पहाटे सर्व गावांमध्ये भक्तिमय वातावरण तयार झाले होते. सूर्य उदयाला हनुमान मंदिर येथे फुले टाकून पवन शुद्ध हनुमान की जय, रामदूत हनुमान की जय याचा नाम घोष करण्यात आला तसेच महिलांनी पाळण्याला झोका देत पाळणा गात हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानंतर ठिकठिकाणी महाप्रसादाचे आयोजन करून एकोप्याने प्रसादाचा स्वाद घेतला.

# सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या महासंचालक पदी प्रविण पाटील यांची नियुक्ती



इंदापूर प्रतिनिधी (समर्थ गांवकरी)

सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रशी गेल्या दशकभरापासून घट्ट नातं जपणारे आणि राज्यातील सायकलिंग चळवळीचे एक भक्कम आधारस्तंभ ठरलेले प्रविण व्ही. पाटील यांची महासंचालक आणि कार्यकारी अधिकारी म्हणून राष्ट्रीय पातळीवर महत्त्वाची पदी सायकलिंग असोसिएशन ऑफ इंडिया मध्ये नियुक्ती झाली.ही

महाराष्ट्रातील सायकलिंग क्षेत्रासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. १ एप्रिल २०२६ पासून नवी दिल्ली येथे पदभार स्वीकारला आहे.

सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या दृष्टीने ही केवळ वैयक्तिक यशाची बाब नसून,संपूर्ण महाराष्ट्रासाठी आणि राज्यातील सायकलिंग खेळासाठी एक ऐतिहासिक क्षण आहे.

गेल्या १० वर्षांत प्रविण पाटील यांनी संघटनेसोबत काम करताना सायकलिंगच्या विकासासाठी सातत्याने योगदान दिले आहे.ते संघटनेचे एक भक्कम आधार स्तंभ राहिले असून, कै.प्रताप जाधव यांच्या सहकार्याने महाराष्ट्रात सायकलिंगसाठी मजबूत पायाभूत सुविधा उभारण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.तसेच,एशियन सायकलिंग कोनफिडीशन माजी जनरल सेक्रेटरी सरदार ओंकार सिंग पाटील,फेडरेशन ऑफ इंडिया अध्यक्ष पंकज सिंग आणि जनरल सेक्रेटरी मनिंदर पाल सिंग यांनी भारतीय सायकलिंगसाठी घातलेल्या भक्कम पायाभरणीचे सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र तर्फे विशेष कौतुक करण्यात येते.

नव्या जबाबदारीच्या प्रवासात प्रविण पाटील यांच्यासोबत अजीत सिंग (टेक्निकल डायरेक्टर), डॉ.धर्मेंद्र लांबा,अंकाक्षा दहात,प्रिया चिप आणि राकेश कुमार आदी सक्षम टीम कार्यरत आहे.

सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या विद्यमान पदाधिकाऱ्यांनी देखील या यशाबद्दल शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.मा.ना.श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले साहेब महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री तथा पालकमंत्री लातूर जिल्हा,संघटनेचे अध्यक्ष अँड.विक्रम रोठे, उपाध्यक्ष अविनाश कदम,यशवंत नडगम, धनंजय वानखेडे,अभिजीत मोहिते तसेच म ानद सचिव प्रा.संजय साठे आणि खजिनदार भिकन अंबे,प्रा. साईनाथ थोरात यांनी प्रविण पाटील यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रला पूर्ण विश्वास आहे की प्रविण. व्ही. पाटील यांच्या नेतृत्वाखाली भारतीय सायकलिंग नव्या उंचीवर पोहोचेल आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा तिरंगा अधिक उंच फडकवेल. सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र च्या सर्व पदाधिकारी व खेळाडू यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# डांग,गुजरात :( समर्थ गावकरी ) हनुमान जन्मोत्सवाची भव्य उत्साहात साजरी - जय श्री राम च्या जयघोषाने वातावरण भक्तिमय

(समर्थ गांवकरी)

प्रकृतीच्या कुशीत वसलेल्या आणि प्रभू श्रीरामांच्या चरणस्पर्शाने पावन झालेल्या डांग जिल्ह्यात आज हनुमान जन्मोत्सव अत्यंत उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. जिल्ह्याच्या मुख्य ठिकाण आहवा तसेच वघई, सुबीर आणि पर्यटन स्थळ सापुतारा येथे पहाटेपासूनच हनुमान मंदिरांमध्ये भाविकांची मोठी गर्दी उसळली होती.

डांग जिल्हा भगवान रामांच्या वनवास काळातील 'दंडकारण्य' म्हणून ओळखला जातो. तसेच येथील अंजनकुंड हे हनुमानजींचे जन्मस्थळ मानले जात असल्यामुळे या सणाला स्थानिकांसाठी विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.







या उत्सवानिमित्त विविध मंदिरांमध्ये पहाटे मारुती यज्ञ, विशेष पूजा–अर्चा आणि हनुमान जन्मवेळी महाआरतीचे आयोजन करण्यात आले. बजरंगबली की जय आणि जय श्री राम च्या घोषणांनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.अनेक ठिकाणी भव्य शोभायात्रांचे आयोजन करण्यात आले. आहवा तालुक्यातील भापखल, जाखाना आदी गावांमध्ये केशरी ध्वज–पताकांसह मोठ्या संख्येने युवक आणि महिलांनी सहभाग घेतला. शोभायात्रेदरम्यान शिस्तबद्ध पद्धतीने रामधून आणि हनुमान चालीसाचे पठण करण्यात आले. संध्याकाळी विविध ठिकाणी महाप्रसाद आणि भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये हजारो भाविकांनी प्रसाद ग्रहण करून समाधान व्यक्त केले. सापुताऱ्याच्या डोंगरांम ध्ये घुमणारे घंटानाद, भजन–कीर्तन यामुळे पर्यटकही या आध्यात्मिक उत्सवात सहभागी झाले.कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पोलिस प्रशासनाने कडक बंदोबस्त ठेवला होता. एकूणच, डांग जिल्ह्यात श्रद्धा आणि उत्साहाच्या वातावरणात हनुमान जयंती यशस्वी झाली.

# परतीच्या प्रवासात निघालेले मलजीबुवा यांच्या कावडीचे वडापुरीत उत्साहात स्वागत

इंदापूर प्रतिनिधी (समर्थ गांवकरी)



वडापुरी( ता– इंदापूर) येथे( दि. १ एप्रिल) शिखर शिंगणापूर यात्रा द्वादशीला संपन्न झाल्यानंतर परतीच्या प्रवासात निघालेले मलजीबुवा यांची कावड वडापुरी येथे दाखल झाल्यानंतर या कावडीचे उत्साह पूर्वक स्वागत करून दुसऱ्या मुक्कामाला ३५ बैलगाड्यांसह हजारो भावीक वडापुरी येथे दाखल झाली होती .

मलजीबुवा यांची कावड १३४० च्या पूर्वीपासून शिखरशिंगणापूर पायी कावड यात्रा करीत असून १३४० पूर्वी मालजीबुवा यांनी नातेपुते येथे समाधी घेण्यापुर्वी वडापुरी येथे पाटील यांच्या वाड्यावर पाट, चिपळ्या, पादुका व काटी ठेऊन गेले आहेत. त्यांचे हे साहित्य पाटील यांनी आज ही देवघरात ठेवल्या आहेत.त्याचे पूजन व आरती या दरम्यान केली जाते.

सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील जेऊरवाडी येथील मालजीबुवाची कावड ही एक वर्षा आड शिखर शिंगणापूर पायी यात्रा करत असते. यामध्ये यावर्षी जुन्या पद्धतीच्या ३५ नंदीच्या बैलगाड्या आणि हजारो गावातील सर्व जाती धर्माची लोक एकत्र यामध्ये दिसून आली . ही कावड म्हणजे जेऊरवाडी गावाचे श्रद्धेचे एकात्मतेचे प्रतीक आहे.

दि १एप्रिल रोजी वडापूरी येथे कावड दाखल झाल्यानंतर वडापुरी येथील पाटील परिवार व ग्रामस्थ यांनी त्यांचे जंगी स्वागत केले. त्यानंतर वाजत गाजत व लेझीम नृत्याच्या तालावर या कावडीचे मुक्काम ठिकाणी आरती करण्यात आली.वडापुरी गावचे राजेंद्र पाटील, सत्यवान पाटील व हरिदास पाटील यांनी जेवणाच्या पंगतीचे आयोजन केले होते त्यास कावड सोहळ्यातील भाविक व गावातील ग्रामस्थ यांनी सहभाग नोंदवला.

# माया सूर्यवंशी यांची वरिष्ठ लेखापाल म्हणून पदोन्नती

अर्धापूर (प्रतिनिधी)
(समर्थ गांवकरी)



जिल्हा कोषागार कार्यालयात कार्यरत असलेल्या सौ. माया संभाजी सूर्यवंशी यांची वरिष्ठ लेखापाल म्हणून जालना येथे पदोन्नती झाली आहे. लेखा,कोषागार विभागाने जारी केलेल्या आदेशानुसार त्यांची जालना जिल्हाधिकारी कार्यालय (अंतर्गत लेखापरीक्षण विभाग) येथे वरिष्ठ लेखापाल म्हणून पदस्थापना करण्यात आली आहे.

सौ.माया सूर्यवंशी यांनी शासनाच्या कोषागार विभागात कर्तव्यदक्ष, प्रामाणिक व शिस्तबद्ध सेवा बजावत प्रशासकीय क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. आर्थिक काम काजातील अचूकता, जबाबदारीची जाणीव आणि कार्यालयीन काम काजातील सातत्यपूर्ण योगदान याची दखल घेत पदोन्नती करण्यातआली आहे. त्यांनी नांदेड जिल्हा कोषागार कार्यालयातही कर्तव्य दक्ष म्हणून काम केले आहे.त्यांनी केलेल्या कामाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वेळोवेळी दखल घेतली आहे.वरीष्ठ लेखापाल म्हणून सौ. माया संभाजी सूर्यवंशी यांची पदोन्नती झाल्याबद्दल सासरे बालाजी सदाबा पाटील सूर्यवंशी,बंधू दासराव बापूराव पाटील पुयड यांच्यासह नातेवाईकांनी अभिनंदन केले आहे.

# अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथे 'व्हर्टिगो क्लिनिक'ची सुरुवात; तज्ज्ञ डॉक्टरांकडून विशेष सेवा उपलब्ध

नाशिक(समर्थ गांवकरी)

अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथे चक्कर येणे (Vertigo), तोल जाणे आणि संतुलनाशी संबंधित समस्यांवर अचूक निदान व उपचार देण्यासाठी विशेष 'व्हर्टिगो क्लिनिक' सुरू करण्यात आले आहे. हे क्लिनिक दर बुधवारी कार्यरत राहणार असून, न्यूरोलॉजी आणि कान–नाक–घसा (ENT) तज्ज्ञांच्या संयुक्त मार्गदर्शनाखाली रुग्णांना सर्वसमावेशक उपचार सेवा उपलब्ध होणार आहे. या क्लिनिकचे नेतृत्व न्यूरोलॉजिस्ट डॉ. विशाल सावळे पाटील, न्यूरोलॉजिस्ट डॉ. प्राची पवार आणि कान–नाक–घसा तज्ज्ञ डॉ. पंकज भट करणार आहेत. या उपक्रमामुळे चक्कर येणे, असंतुलन, डोके हलके वाटणे, कानातील समस्या किंवा मेंदूशी संबंधित कारणांमुळे होणाऱ्या त्रासाचे अचूक निदान आणि योग्य उपचार एकाच ठिकाणी मिळणार आहेत.

यावेळी बोलताना डॉ. विशाल सावळे पाटील म्हणाले,

व्हर्टिगो ही अनेक कारणांनी उद्भवणारी समस्या आहे आणि तिचे योग्य निदान करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मेंदू, नसांशी संबंधित आजार किंवा रक्तपुरवठ्यातील बदल यामुळेही चक्कर येऊ शकते. या क्लिनिकच्या माध्यमातून आम्ही रुग्णांना अचूक निदान आणि योग्य उपचार देण्याचा प्रयत्न करणार आहोत.

डॉ. प्राची पवार यांनी सांगितले,

अनेक वेळा रुग्णांना चक्कर येणे ही सामान्य समस्या वाटते, परंतु त्यामागे गंभीर न्यूरोलॉजिकल कारणे असू शकतात. वेळेवर तपासणी आणि उपचार केल्यास या समस्यांवर प्रभावी नियंत्रण मिळवता येते. या क्लिनिकमुळे रुग्णांना एकाच ठिकाणी तज्ज्ञ सल्ला मिळणार आहे.

डॉ. पंकज भट यांनी नमूद केले,

व्हर्टिगोच्या अनेक केसेसमध्ये कानातील संतुलन यंत्रणेचा (inner ear balance system) संबंध असतो. ENT तपासणी, योग्य चाचण्या आणि विशिष्ट थेरपीद्वारे रुग्णांना जलद आराम मिळू शकतो. या क्लिनिकच्या माध्यमातून आम्ही रुग्णांना संपूर्ण आणि समन्वित उपचार देऊ शकतो.

यावेळी बोलताना अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलचे केंद्र प्रमुख श्री. अनुप त्रिपाठी यांनी सांगितले की,

रुग्णांना विशेष आणि तज्ज्ञ उपचार सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणे हा आमचा उद्देश आहे. 'व्हर्टिगो क्लिनिक'च्या माध्यमातून न्यूरोलॉजी आणि कान–नाक–घसा तज्ज्ञांचा एकत्रित दृष्टिकोन रुग्णांना मिळणार असून, त्यामुळे निदान आणि उपचार अधिक परिणामकारक होतील. भविष्यातही अशा विशेष क्लिनिक्सच्या माध्यमातून आम्ही रुग्ण–केंद्रित सेवा अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्नशील राहू.

अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथे सुरू करण्यात आलेले 'व्हर्टिगो क्लिनिक' हे चक्कर येणे व संतुलनाशी संबंधित समस्यांवर अचूक, तज्ज्ञ आणि समन्वित उपचार देणारे एक महत्त्वाचे केंद्र ठरणार आहे.







नाशिक शहरात सायंकाळी सहाच्या दरम्यान धुवाधार पावसाची सुरुवात झाली. संपूर्ण रस्ते जलमय झाले होते. काही काळ वाहतूक कोंडी झाली होती

# अहिल्यानगर शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भव्य महोत्सवाचे आयोजन

**जयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी सुरेश बनसोडे तसेच मार्गदर्शक पदी अशोकराव गायकवाड, कार्याध्यक्ष पदी सुमेध गायकवाड, निमंत्रक पदी अजय राव साळवे, सचिव पदी किरण दाभाडे यांची निवड**

अहिल्यानगर(समर्थ गांवकरी)

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शहरात भव्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी नगरसेवक सुरेश भाऊ बनसोडे यांची निवड करण्यात आली आहे.

या महोत्सवाची सुरुवात ९ एप्रिलपासून होणार असून विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

पत्रकार परिषदेत आयोजकांनी सांगितले की, यंदा जयंती मोठ्या उत्साहात आणि एकजुटीने साजरी केली जाणार आहे. शहरातील तसेच उपनगरातील सर्व मंडळांचा या महोत्सवात सहभाग असणार असून, पूर्णाकृती पुतळ्यासमोरील मैदानावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

महोत्सवानिमित्त चित्रकला, रांगोळी, निबंध, वक्तृत्व स्पर्धा तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. १४ एप्रिल रोजी भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून ती शांततेच्या मार्गाने पार पाडण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे.

९ एप्रिल रोजी प्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांचा गायनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात येणार आहे. तसेच ११ एप्रिल रोजी महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंतीही समितीच्या वतीने साजरी करण्यात येणार आहे.

अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर सुरेश बनसोडे यांनी सर्वांचे आभार मानून शहरातील आंबेडकरी समाजासह सर्व नागरिकांनी या महोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन केले. नगरसेवक मयूर बांगरे यांनी १४ एप्रिल हा



दिवस केवळ सुट्टी म्हणून न साजरा करता एकत्र येऊन जयंती उत्साहात साजरी करण्याचे आवाहन केले. जयंती महोत्सव सुमारे पंधरा दिवस चालणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

यावेळी सर्वानुमते डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल नगरसेवक सुरेश भाऊ बनसोडे यांचा सत्कार करताना ज्येष्ठ नेते अशोक गायकवाड, सुमेध गायकवाड ,नगरसेवक मयूर बांगरे, सुनील शिंदे, जयंत गायकवाड, प्रा. विलास साठे, किरण दाभाडे, अंकुश मोहिते, समीर भिंगारदिवे, सिद्धार्थ आढाव, येसुदास वाघमारे आदींसह समितीचे अनेक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समितीची सविस्तर रचना पुढीलप्रमाणे– मार्गदर्शक – अशोक गायकवाड, अध्यक्ष – सुरेश भाऊ बनसोडे, कार्याध्यक्ष – सुमेध गायकवाड, निमंत्रक – अजय राव साळवे, सचिव – किरण दाभाडे.

उपाध्यक्ष – विशाल गायकवाड, कौशल गायकवाड, विशाल भिंगारदिवे, अमित काळे, सुजित घंगाळे, विनोद भिंगारदिवे, मुन्ना भिंगारदिवे, जय कदम, विजय गायकवाड, दीपक लोंढे, सुनील कांबळे, अक्षय भिंगारदिवे, विजय भिंगारदिवे, विशाल कांबळे, सागर ठोकळ.

क्रीडा व सांस्कृतिक विभाग प्रमुख – प्रा जयंत गायकवाड , प्रा विलास साठे , प्रा जाधव एल बी , प्रा डी आर जाधव, प्रा. पगारे सर, प्रसिध्दी प्रमुख – महेश भोसले , सचिन मोकळं , संदीप शिंदे

सल्लागार – जेवियर भिंगारदिवे, लॉरेन्स स्वामी, , नगरसेवक मयूर बांगरे, संभाजी भिंगारदिवे, सुनील शेत्रे, सुनील साळवे, परिमल निकम ,संजय जगताप, प्रवीण चाबुकस्वार, विजय गव्हाळे, महेंद्र राजगुरू, अँड संदीप पाखरे, दीपक अमृत, विजय भांबळ, सुनील शिंदे, सदाशिव भिंगारदिवे, जयाताई गायकवाड, गौतमी भिंगारदिवे, भाऊ भिंगारदिवे, किरण गायकवाड, दीपक पाटोळे , दीपक अमृत, मिरवणूक नियोजन समिती– शुभम भिंगारदिवे, राजू दाभाडे, विशाल साळवे, आकाश सरोदे, अजय शेळके, जय कदम, सुजित घंगाळे, विशाल गायकवाड, सिद्धांत वाकचौरे, समीर भिंगारदिवे, संजय साळवे आदी मान्यवरांवर जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

एकूणच, शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त एकात्मता, सामाजिक बांधिलकी आणि उत्साहाचा संदेश देणारा भव्य महोत्सव साजरा होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# दखनचा राजा जोतिबाची यात्रा उत्साहात संपन्न

इंदापूर (समर्थ गांवकरी)

गुरुवार दि. २ एप्रिल २०२६ श्री.ज्योतिबा देवाची यात्रेस प्रारंभ झाला असून इंदापूर तालुक्याचे ग्रामदैवत देव ज्योतिबाला अभिषेक करून यात्रेला सुरुवात झाली. यावेळी जोतिबाच्या नावांन चांगभलं या जयघोषाने भक्तांनी एकच जल्लोष केला संपूर्ण .जोतिबाच्या दर्शनासाठी पुणे सोलापूर नगर जिल्ह्यातून ज्योतिबाच्या दर्शनासाठी

हजारो भाविक जोतिबाचा माळ येथील मंदिरात येतात.श्री ज्योतिबा ट्रस्ट तर्फे येणाऱ्या भाविकांना महाप्रसाद व सरबतचे वाटप करण्यात आले. दुपारी ४ वाजता नगराध्यक्ष भरत शेठ शहा व जोतिबा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अरविंद वाघ यांच्या शुभहस्ते महाआरती होऊन दखनचा राजा जोतिबा यांचा शाही छबिना ग्राम प्रदक्षणेसाठी निघाला. यावेळी पुजारी रोहित जाधव, आश्विन जाधव,संदीप जाधव,बबनराव सूर्यवंशी. बाबासाहेब घाडगे , गोरख शिंदे नगरसेवक अक्षय सुर्यवंशी, अतुल शेटे पाटील, अण्णा ढावरे. बाळासाहेब उंबरे, नारायण साळुंखे, कैलास कदम,

हमीद आत्तार , महादेव चव्हाण, भारत बोराटे जोतिराम सुर्यवंशी मंगेश औताडे , हनुमंत बोंगाणे, शिवाजी मुखरे, संदिपान कडवळे, हनुमंत कांबळे इ .उपस्थित होते.



# अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामीण भागात घरपट्टी व पाणीपट्टी वाढणार!

अहिल्यानगर(समर्थ गांवकरी)

जिल्ह्यातील ग्रामीण भागात एप्रिल २०२६ पासून फेरमुल्यांकनानुसार घरपट्टी व पाणीपट्टीची आकारणी होणार आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी जिल्ह्यातील १३२८ ग्रामपंचायतींना एप्रिलअखेर सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले आहेत.

आतापर्यंत यातील १२८ ग्रामपंचायतींनी कर आकारणी अंतिम केली आहे तर ३१६ ग्रामपंचायतींनी हरकतींवर निर्णय घेऊन कर आकारणीची यादी अंतिम केली आहे उर्वरित ११५२ ग्रामपंचायतीमध्ये नागरिकांच्या हरकतींवर सुनावणी सुरू आहे. या फेरमुल्यांकनामुळे ग्रामपंचायतींच्या उत्पन्नात दुपटीहून अधिक वाढ होण्याची शक्यता आहे.

जिल्हा परिषदेकडून ही माहिती देण्यात आली. यापूर्वीचे मूल्यांकन सन २०१९-२० मध्ये झाले होते. दर चार वर्षांनी फेरमूल्यांकन करणे बंधनकारक आहे. मात्र सन २०२३ मध्ये ते झाले नाही. आता सन २०२६ मध्ये होत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील एकूण ग्रामपंचायतींची चालू व थकबाकी रक्कमही एकूण २५४ कोटींच्या घरात जाण्याची शक्यता आहे.

**घरपट्टीच्या फेरमूल्यांकनासाठी मोठ्या काही ग्रामपंचायतींनी तांत्रिक संस्थांची नियुक्ती केली होती तर कमी लोकसंख्येच्या गावात ग्रामसेवक व कर्मचाऱ्यांनी सर्वेक्षण केले. विस्तार अधिकाऱ्यांनी त्याची फेरपडताळणी केली. ३० एप्रिलअखेर फेरमूल्यांकनानुसार कर आकारणी अंतिम करण्याची सूचना देण्यात आली आहे.**

**–दादाभाऊ गुंजाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.**

जिल्ह्यातील ग्रामपंचायतींकडून केवळ चालू कराची मागणी केली जात होती. ती सुमारे ६० कोटी रुपयांपर्यंत असे. त्यामध्ये सुमारे २१४ कोटींची थकबाकीची रक्कम मागणीत नोंदवली जात नव्हती. त्यामुळे कराची वसुली भरपूर दिसत असली तरी ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात फरक पडत नव्हता.

ग्रामपंचायतींकडून घरपट्टी व पाणीपट्टीचे फेरमूल्यांकनच होत नसल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारी व ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ यांनी ग्रामपंचायतींना फेरमूल्यांकनाचे आदेश देल कालबद्ध कार्यक्रमही ठरवून दिला.

ग्रामपंचायतच्या हद्दीतील मालमत्तांचे सर्वेक्षण करून फेरमूल्यांकन करण्यास नोव्हेंबरमध्ये सुरुवात झाली. नागरिकांच्या हरकती मागवून सुनावणी घेण्यात आली.

जिल्ह्यातील अशा १३२८ ग्रामपंचायतीची १३२४ ग्रामपंचायतींनी ग्रामसभा, मासिक सभा घेऊन कराचे दर निश्चित केले. १२०० ग्रामपंचायतींनी दर निश्चित केले. ११५२ मध्ये हरकतींची सुनावणी सुरू आहे. ३१६ ग्रामपंचायतींनीही कर आकारणीची यादी अंतिम केली आहे तर १२८ ग्रामपंचायतींनी सुधारित दरावर शिक्कामोर्तक करत प्रारूप मागणी तयार केली. सर्व ग्रामपंचायतींकडून १ मेपासून नवीन दरानुसार नोटीस पाठवण्याचे नियोजन आहे.

जिल्ह्यातील १३२८ ग्रामपंचायतींकडे फेब्रुवारीअखेर पाणीपट्टीची चालू व थकबाकीची मागणी ८६.८० कोटी, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात दिलेली सवलत वगळून ५३.१७ कोटी वसुली (६०.११ टक्के) झाली तर घरपट्टीची एकूण चालू व थकबाकी अशी १६८.१७ कोटी तर वसुली ९२.७६ कोटी (५५.१६ टक्के) झाली आहे.

# पोदार इंटरनॅशनल स्कूल, संगमनेर येथे नवीन शैक्षणिक वर्षाची (२०२६-२७) उत्साहपूर्ण व प्रेरणादायी सुरुवात

संगमनेर(समर्थ गांवकरी)

संगमनेर येथील पोदार इंटरनॅशनल स्कूल मध्ये नवीन शैक्षणिक वर्षाच्या स्वागतासाठी आयोजित विशेष प्रार्थना सभा उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडली. सुट्टीनंतर शाळेत परतलेल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद, उत्सुकता आणि नव्या स्वप्नांची चमक स्पष्ट दिसत होती.

कार्यक्रमाची सुरुवात ज्ञानदेवतेच्या सरस्वती पूजनाने करण्यात आली. त्यानंतर प्रार्थना, शपथविधी आणि दैनंदिन बातम्यांनी वातावरणात सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली. अक्षिता मिश्रा हिने आपल्या ओघवत्या आणि आत्मीय स्वागतपर भाषणातून सर्वांचे मन जिंकले.

विद्यार्थ्यांनी सादर केलेली नाटिका आणि आकर्षक नृत्याविष्कार हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. या सादरीकरणांमधून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि टीमवर्क सुंदरपणे दिसून आला.

या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन आणि यशस्वी आयोजन करण्यासाठी वर्ग शिक्षिका पूनम थोरात, नृत्य शिक्षिका अनुजा वाघमारे आणि कार्यक्रम समन्वयक पंकज कुटे यांचे विशेष योगदान लाभले.

नवीन शैक्षणिक सत्राच्या मध्यात शाळेत रुजू झालेल्या नवीन शिक्षकांचा परिचय व सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी शिक्षकांचे शाळा परिवारात स्वागत करून त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यांच्या ज्ञान





व अनुभवामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत निश्चितच भर पडेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

यानंतर अमित सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शिस्त, सातत्य आणि परिश्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते मुख्याध्यापिका श्रीमती मीनाक्षी मिश्रा यांचे प्रेरणादायी भाषण. त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले, प्रत्येक नवीन दिवस ही एक सुवर्णसंधी आहे. आत्मविश्वास, सकारात्मकता आणि कठोर परिश्रम यांच्या बळावर तुम्ही तुमचे स्वप्न नक्कीच पूर्ण करू शकता. या नव्या सुरुवातीचा पूर्ण फायदा घ्या आणि उत्कृष्टतेकडे वाटचाल करा.

कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शनाने झाला आणि राष्ट्रगीताने सभेची सांगता करण्यात आली.

ही विशेष सभा केवळ नव्या सत्राची सुरुवात नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या मनात नवचैतन्य, प्रेरणा आणि यशस्वी भविष्याची उमेद निर्माण करणारी ठरली. सर्व विद्यार्थ्यांनी नव्या उमेदीने आणि जिद्दीने पुढे जाण्याचा संकल्प केला.

शाळेचे उपप्राचार्य श्री. योगेश आवारी तसेच सर्व समन्वयक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना आगामी शैक्षणिक वर्षासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. येणारे वर्ष विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक प्रगतीसाठी यशस्वी व फलदायी ठरो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# ओतूर येथे हनुमान जयंती उत्साहात; भजन-कीर्तन, अभिषेक व प्रसाद वितरणाने भक्तिमय वातावरण!

ओतूर (समर्थ गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील ओतूर येथे गुरुवार दि. २ एप्रिल रोजी श्री हनुमान जयंती उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला, अशी माहिती जय बजरंग प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनिल डुंबरे यांनी दिली.

हनुमान जन्मोत्सवानिमित्त पहाटे ३ ते ५ या वेळेत हनुमान प्रासादिक भजनी मंडळ, ओतूर यांचा काकडा झाला. त्यानंतर सकाळी ५ ते ७ या वेळेत ह.भ.प. मंगेश महाराज डुंबरे यांचे हरिकीर्तन झाले. सकाळी ७ ते ८ या वेळेत मंदा व छबुराव सुदाम तांबे यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला. पुढे ९ ते ११ या वेळेत संत ज्ञानेश्वर भजनी मंडळ, पिंपळगाव जोगा यांचे भजन झाले. त्यानंतर रामभाऊ व लक्ष्मण धोंडीबा साळुंके यांच्या वतीने प्रसाद वितरण करण्यात आले, तर प्रमोद दत्तात्रेय पानसरे यांच्या वतीने लाडू प्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी संस्थापक अध्यक्ष अनिलशेठ तांबे, रघुनाथ तांबे, राजेंद्र हांडे, सतीश तांबे, दिलीप डुंबरे, धनंजय ढमाले, बाळासाहेब गावडे, सीताराम डुंबरे, शांताराम पानसरे, शंकर हाडवळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी सौ. मंदाताई व छबुराव सुदाम तांबे या दांपत्याचे विशेष सहकार्य लाभले.

तसेच ओतूर परिसरातील ढमाले मळा, कोळमळा, डुंबरवाडी, रोहकडी, आंबेगव्हाण आदी गावांमध्येही हनुमान जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

# ठाणे मनपाच्या उत्पन्नाला शीळ भागातील अनधिकृत गोडाऊनची घरघर

## दिव्यात नियोजनबद्ध विकासाला 'ब्रेक'

ठाणे/संतोष पडवळ(समर्थ गांवकरी)

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात, विशेषतः दिवा-शीळ रस्ता, भारत गिअर ते पोलीस स्टेशन आणि दिवा ब्रिज ते शिळफाटा या परिसरात गेल्या काही वर्षांत अनधिकृत गोडाऊनचे पेव फुटले आहे. २०२२ ते २०२६ या प्रशासकीय राजवटीच्या काळात या अनधिकृत बांधकामांमध्ये प्रचंड वाढ झाली असून, यामुळे शहराच्या नियोजनबद्ध विकासाला मोठा अडथळा निर्माण झाला आहे. शिवसेना नगरसेविका सौ. अर्चना निलेश पाटील यांनी या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

दिवा प्रभागात हजारोच्या संख्येने पत्र्याची मोठी गोडाऊन उभी राहिली आहेत. ही बांधकामे करताना महानगरपालिकेची कोणतीही अधिकृत परवानगी घेतली नसल्यास यामुळे पालिकेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होऊ शकते. या गोडाऊनमधून कोणत्या प्रकारचे व्यवसाय चालतात, याची कोणतीही नोंद प्रशासनाकडे नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, यांना व्यावसायिक 'मालमत्ता कर' भरावा लागतो का याची माहिती पालिका प्रशासनाने अद्याप संबंधित लोकप्रतिनिधींना दिलेली नाही. यामुळे महानगरपालिकेच्या तिजोरीवर मोठा दरोडा पडत असल्याची शक्यता व्यक्त होत आहे. उत्पन्नाचा हा मोठा स्रोत अनधिकृत धंद्यांमुळे आटला आहे.

**असुरक्षितता आणि आगीचा धोका:**

या पत्र्याच्या शेडमध्ये ज्वलनशील पदार्थांची साठवणूक किंवा अनधिकृत कारखाने चालवले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. नियोजनशून्य पद्धतीने बांधलेली ही गोडाऊन आगीच्या घटनांना निमंत्रण देत आहेत.

अग्निशमन दलाला अडथळा: अरुंद रस्ते आणि दाटीवाटीने झालेली ही बांधकामे यामुळे आगीसारखी दुर्घटना घडल्यास अग्निशमन दलाच्या गाड्या पोहचणे कठीण होते.

**सुरक्षेचा अभाव:** कोणत्याही 'फायर ऑडिट'शिवाय चालणाऱ्या या गोडाऊनमुळे आजूबाजूच्या निवासी क्षेत्रालाही मोठा धोका निर्माण झाला आहे.

ठाणे शहराने स्वच्छतेच्या बाबतीत ३५ व्या क्रमांकावरून १५ व्या क्रमांकापर्यंत मजल मारली आहे. मात्र, दिवा परिसरातील हे अनियंत्रित आणि विद्रूप पत्र्याचे साम्राज्य शहराच्या सौंदर्याला बाधा आणत आहे. जर या अनधिकृत बांधकामांवर वेळीच कारवाई झाली नाही, तर शहराच्या क्रमवारीत पुन्हा घसरण होण्याची भीती नगरसेवक बाबाजी पाटील यांनी याआधीच व्यक्त केली आहे.

सौ. अर्चना पाटील यांनी १६ मार्च २०२६ रोजी या संदर्भात सहाय्यक आयुक्तांना पत्र दिले होते मात्र त्यावर अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

**पुढील आव्हाने आणि मागणी**

शहराच्या शाश्वत विकासासाठी ही अनधिकृत गोडाऊन जमीनदोस्त करणे आवश्यक आहे.

१. या गोडाऊनची संपूर्ण माहिती लेखी स्वरूपात







**प्रशासनाने हा विषय गांभीर्याने घ्यावा. इतके दिवस चालढकल का केली जाते हेच कळत नाही.या ठिकाणी व्यवसाय करणारे स्थानिक नसून बहुतांश हे बाहेरून आलेले आहेत. त्यात बांगलादेशीही असू शकतात. शहराच्या भविष्यासाठी ही गंभीर बाब असून तात्काळ अनधिकृत व बेकायदा गोडाऊन बाबत पालिका आयुक्तांनी सहाय्यक आयुक्तांना निर्देश द्यावेत अशी आमची मागणी आहे.**

**– अर्चना निलेश पाटील, नगरसेविका**

**नगरसेविका अर्चना पाटील यांनी जे पत्र दिले आहे त्याबाबत आम्ही संपूर्ण कारवाईबाबतचा अहवाल त्यांना देणार आहोत. गोडाऊन बाबत परमिशन आम्ही देत नसतो. आणि अशा परमिशन दिलेल्या सुद्धा नाहीत. त्यामुळे असे गोडाऊन आढळल्यास आम्हाला संपर्क साधा आम्ही कारवाई करू.**

**– शिवप्रसाद नागरगोजे**
**सहायक आयुक्त, दिवा प्रभाग समिती**

जाहीर करावी.

२. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी.

३. थकीत मालमत्ता कराची वसुली करून बेकायदेशीर बांधकामांवर त्वरित बुलडोझर चालवावा.

शीळ विभाग व दिवेकरांच्या हितासाठी आणि शहराचा 'स्मार्ट' दर्जा टिकवण्यासाठी महापालिका आयुक्त यावर काय पाऊल उचलतात, याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.